|| असंतोषः श्रियोर्मूलम् ||

SITARAM MHATRE FOUNDATION

www.sitarammhatre.foundation

Sitaram Smaran, 896, Sector 19B, Koparkhairane, Navi Mumbai - 400709

Mob: 865-735-1626 | Email: info@sitarammhatre.foundation

# प्रकल्पग्रस्तांची आत्मकथने

## प्रश्नावली व मुलाखतीच्या प्रकाशन-संग्रहणाची परवानगी

*(ऑडिओ रेकॉर्डिंग सुरू झाल्याची खात्री केल्यानंतरच खालिल परिच्छेद वाचण्यास सुरूवात करावी.)*

आज तारीख आहे दिदि / मम / व व व व आणि आम्ही आहोत स्थळाचे नाव, जिल्ह्याचे नाव मध्ये. माझे नाव आहे मुलाखत घेणाऱ्याचे पूर्ण नाव आणि माझ्यासोबत आहेत आत्मकथन करणाऱ्या प्रकल्पग्रस्ताचे पूर्ण नाव, राहणार गावाचे नाव , तालुक्याचे नाव , जिल्ह्याचे नाव ज्यांची मी आज सीताराम म्हात्रे फाऊंडेशन, कोपरखैरणे, नवी मुंबई ह्यांच्या "सोनहिरा प्रकल्पग्रस्तांची आत्मकथने" ह्या उपक्रमाअंतर्गत मुलाखत घेणार आहे. ह्या मुलाखतीस ______ ______________________________ देखील उपस्थित आहेत.

### प्रश्नावली

१. तुमचे पूर्ण नाव आणि तुमच्या गावाचे नाव सांगा.

२. ही मुलाखत रेकॉर्ड करण्यास मला तुमची परवानगी आहे का?

३. तुमचा जन्म केव्हा आणि कोणत्या गावात झाला?

४. जवळजवळ ४० वर्षांपूर्वी, साल १९८५ च्या सुमारास तुमच्या जमिनी सोनहिरा पाटबंधारा प्रकल्पासाठी शासनाने ताब्यात घेतल्या. त्याआधी, म्हणजे साल १९८५ पूर्वी, तुमचे व तुमच्या कुटुंबियांचे उत्पन्नाचे साधन काय होते?

५. शासनाने जमिनी ताब्यात घेतल्यानंतरच्या एक-दोन वर्षांच्या कालावधीत तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नावर कशा प्रकारचा परिणाम झाला?

७. शासनाने जमिनी घेण्याआधी स्थानिक लोकांना नोटीशी पाठवल्या होत्या. त्यावेळी तुमच्या कुटुंबात आणि आसपासच्या परिसरात त्या नोटिसींबद्दल काय प्रतिक्रिया उमटल्या होत्या?

८. शासनाने जमिनी जेव्हा ताब्यात घेतल्या त्यावेळच्या कोणत्या विशेष घटना तुम्हाला आठवतात?

९. स्थानिकांकडून जमीन ताब्यात घेण्याची शासनाने पद्धत कशी होती?

१०. तुमची जमीन शासनाने घेतली ह्या घटनेचा तुमच्या मनावर त्यावेळी आणि त्यानंतर व्यक्तिशः काय परिणाम झाला? **उपप्रश्न** : तुमच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था कशी होती?

११. जमिनी जाण्याआधी तुमच्याकडे बैल होते का? जमीनी गेल्यानंतर ह्याबाबतीत काय बदल झाला?

१२. सोनहिरा प्रकल्पाआधीचं तुमचं जीवन आणि जमीन गेल्यानंतरचं तुमचं जीवन ह्यात काय फरक होता?

आत्मकथन करणाऱ्याची स्वाक्षरी/ठसा | मुलाखतकाराची स्वाक्षरी

१३. शासनाने जमिनी ताब्यात घेण्यास येथील स्थानिक शेतकऱ्यांचा पाठींबा होता की विरोध? **उपप्रश्न** : तो त्यांनी कसा व्यक्त केला?

१४. शासनाने तुमच्या जमिनी ताब्यात घेतल्यानंतर त्या जमिनीचा जो काही मोबदला दिला तो कशा-कशा स्वरूपाचा होता? **उपप्रश्न:** तो कधी मिळाला?

१५. शासनाच्या कागदपत्रांमध्ये असे नमूद केले जाते की त्यांनी जमिनी ताब्यात घेतल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना शिक्षणापासून ते नोकरी-धंद्यांपर्यंत अनेक प्रकारच्या सोयीसुविधा पुरविल्या जातात. एक प्रकल्पग्रस्त म्हणून तुम्हाला व तुमच्या कुटुंबाला यापैकी कोणकोणत्या सोयीसुविधा मिळाल्या?

१६. शासनाने तुमच्या व इतर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी कोणकोणत्या प्रकारच्या उपाययोजना आजतागायत केल्या?

१७. तुम्हाला प्रकल्पग्रस्त दाखला मिळाला होता का? ह्या दाखल्याचा तुम्हाला कोणकोणत्या प्रकारे फायदा झाला?

१८. तुम्ही आम्हाला मुलाखत देऊन प्रकल्पग्रस्तांच्या आजवर न लिहिल्या गेलेल्या इतिहासात एका नवीन अध्यायाची भर घातली आहे. त्याबद्दल समस्त प्रकल्पग्रस्त समाज आपला सदैव ऋणाईत राहील. जाता-जाता आमची एक नम्र विनंती आहे : आमच्या “प्रकल्पग्रस्तांची आत्मकथने” ह्या उपक्रमासाठी आवश्यकता पडल्यास आपण आम्हाला पुन्हा मुलाखत द्याल का?

---

## मुलाखतीच्या प्रकाशनाची व संग्रहणाची परवानगी

आम्ही, आत्मकथन करणाऱ्याचे पूर्ण नाव, राहणार आत्मकथन करणाऱ्याचा पूर्ण पत्ता, व मुलाखतकाराचे पूर्ण नाव, राहणार मुलाखतकाराचा पूर्ण पत्ता लिहून देतो की आज दिनांक दिदि /मम/वववव रोजी स्थळाचे नाव येथे घेतलेली उपरोक्त मुलाखत व तीची भाषांतरे आणि सोबत पाठवलेली मुलाखतीतील मजकुराशी संबंधित कागदपत्रे व फोटो यांच्या प्रकाशनाची व संग्रहणाची परवानगी आम्ही स्वखुशीने **सीताराम म्हात्रे फाऊंडेशन, कोपरखैरणे, नवी मुंबई** ह्यांना विनामोबदला देत आहोत. उपर्निदिष्ट प्रकाशनांमध्ये माझे उपरोक्त कथन माझ्या नावानिशी / अनामिकपणे वापरण्यास माझी सहमती आहे.

आत्मकथन करणाऱ्याची स्वाक्षरी/ठसा

मुलाखतकाराची स्वाक्षरी

आत्मकथन करणाऱ्याचे पूर्ण नाव

मुलाखतकाराचे पूर्ण नाव

प्रकल्प संचालक

**सीताराम म्हात्रे फाऊंडेशन**

कोपरखैरणे, नवी मुंबई